# Current Global Reviewer

**Indexed (SJIF)**

ISSN 2319-8[illegible]

Impact Factor - 7.139

ISSN 2319-8648

Chief Editor
Arun B. Godam
Latur, Dist. Latur-413512
(Maharashtra, India)
Mob. 8149668999

Publisher
Shaurya Publication.

(13) Dr. Shivaji Diwan (Pol. sci.)

ijindex
digital directory of Indian journals

ISSN 2277 - 7539 (Print)
Impact Factor - 5.631 (SJIF)

# Excel's International Journal of Social Science & Humanities

An International Peer Reviewed Journal

June - 2021
Vol. I No. 18

## Social Vital Issues

Editor
Dr. Nandkumar N. Kumbharikar

Co - Editor
Dr. Laxman. K. Ulgade
Dr. Balaji. A. Sable

EXCEL PUBLICATION HOUSE
AURANGABAD

ijindex

ISSN 2277 - 7539 (Print)
Impact Factor - 5.631 (SJIF)

# Excel's International Journal of Social Science & Humanities

**An International Peer Reviewed Journal**

**June - 2021**
**Vol. I No. 18**

**Editor**
***Dr. Nandkumar N. Kumbharikar***
Dept. of Public Administration
SPP College, Sirsala, Dist. Beed.
Emaill - dr.kumbharikarnn@gmail.com

**Co-Editor**
***Dr. Laxman K. Ulgade***
Head.Dept. of Public Administration
Havagiswami College, Udgir, Dist. Latur

***Dr.Balaji A. Sable***
Head.Dept. of Economics
SPP College, Sirsala, Dist. Beed.

**Excel Publication House**
**Aurangabad**

| | | | |
|---|---|---|---|
| 22 | Dr.Thorwe.R.H. | A study of leadership vision and qualities for librarians | 78 |
| 23 | Dr. Ardale S. D. | Human rights and reality of women's status in india | 80 |
| 24 | Dr.Banjara Dilip Lalu | United nation and human rights: an overview of universal declaration of human rights | 83 |
| 25 | Dr. Rajeshri Apparao Jadhav | Challenges of virtual teaching for students from tribal areas of india | 89 |
| 26 | प्रा. परळकर एस.डी. | ब्रिटीशकालीन सामाजिक सुधारणा– एक अभ्यास | 92 |
| 27 | प्रा.डॉ.सोनवणे जी.एन. | जागतिक तापमान वाढ नियंत्रणाबाबत भारताची भूमिका | 95 |
| 28 | डॉ.मस्के डी.बी. | ग्रंथालय आधुनिकीकरण आणि माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचे महत्व | 98 |
| 29 | डॉ.देशमुख एम.बी. | ग्रामसभा: ग्रामीण विकासातील योगदानाचा समाजशास्त्रीय अभ्यास | 101 |
| 30 | डॉ. कानडे अशोक | अधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान | 105 |
| 31 | डॉ.नंदकुमार कुंभारीकर | आरोग्य प्रशासनासमोरील आव्हाने–एक प्रशासकीय अध्ययन | 108 |
| 32 | डॉ.गोंदकर तुकाराम दत्तात्रय | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला विकास विषयक विचार व योगदान | 111 |
| 33 | डॉ.अशोक लक्ष्मण गोरे | आपत्ती व्यवस्थापनः प्रशासकीय आव्हानाचा अभ्यास | 114 |
| 34 | इंगळे शिवानी मच्छिंद्र | अहमदनगर जिल्ह्यातील पर्यटन क्षेत्रावर covid-19 चा झालेला परिणाम | 117 |
| 35 | प्रा. डॉ. के.एम.नागरगोजे | फिल्डमार्शल सॅम माणेकशा आणि भारत- पाकिस्तान-1971 चे युद्ध | 120 |
| 36 | डॉ.पाटील चारुशीला विजयराव | महाराष्ट्रातील कृषी आधारित लघुउद्योगाचा अभ्यास | 123 |
| 37 | डॉ. बा. आ. साबळे<br>हनुमान अ. रासवे | बदलत्या शैक्षणिक धोरणाचा परिणाम | 125 |
| 38 | *अ रिझावन अ हन्नान*<br>*डॉ.मो अताऊल्ला एम.के.* | *महाराष्ट्रातील खेळाडूंच्या प्रमुख समस्या व खेळ सुधारण्यासाठीचे उपाय* | 128 |
| 39 | प्रा.डॉ.सवाई एम.के. | महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या सामाजिक सुधारणा व स्त्री-शिक्षण विषयक कार्य – एक अभ्यास | 131 |
| 40 | डॉ.प्रा.लोखंडे बी.बी | केंद्र–राज्य संबंध आणि पक्षीय राजकारण | 134 |
| 41 | डॉ. बिडवे मारुती शिवाजीराव | ग्रंथालयाच्या उत्पन्न साधनाची निर्मिती | 137 |
| 42 | किरणकुमार मोहन धिमधिमे | हुंडा–प्रथा,समाज आणि स्त्रिया | 140 |
| 43 | डॉ.शिवाजी गो. दिवाण | केंद्र-राज्य संबंध | 143 |
| 44 | सोनाजी गवई<br>डॉ. बालाजी साबळे | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील आर्थिक विचार:एक अभ्यास | 148 |
| 45 | डॉ.सांगळे भगवान श्रीपती | महाराष्ट्राचे महसूल प्रशासन —एक दृष्टिक्षेप | 151 |
| 46 | डॉ.कैलास ज्ञानोबा सावंत | हैद्राबाद मुक्तीलढयात खळेगावातील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान | 156 |
| 47 | डॉ.बालाजी आ साबळे | छत्रपती शिवाजी महाराजांचे कृषी क्षेत्रासाठी आर्थिक योगदान | 159 |
| 48 | डॉ. उलगडे लक्ष्मण काशिनाथ | प्रमुख प्रशासकांची कार्य आणि गुण एक सखोल संशोधनात्मक अभ्यास | 162 |
| 49 | डॉ. रमेश वाघमारे | खोती पध्दत आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर | 164 |
| 50 | प्रा.शिवकुमार उस्तुर्गे | राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक कार्य : एक अभ्यास | 167 |

# केंद्र-राज्य संबंध

**प्रा.डॉ.शिवाजी गोविंदराव दिवाण**
राज्यशास्त्र विभाग,महिला महाविद्यालय,गेवराई.ता.गेवराई जि.बीड
Email- shivajidiwan@gmail.com

**प्रस्तावना :**

भारताने संघराज्य शासन पध्दतीचा स्वीकार केला आहे. याबाबतीत भारताने अमेरिकेचे अनुकरण केले. भारताने संघराज्याचा स्वीकार करताना इतर देशांचे जसेच्या तसे अनुकरण न करता आपल्या भारतीय परिस्थितीला तसे अनुकूल करण्याचा प्रयत्न केला आहे.भारताची सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थिती विचारात घेऊन संघराज्याच्या इतर तत्त्वांचा समावेश संविधानात करण्यात आलेला आहे. संघराज्य याचा अर्थ केंद्र सरकार म्हणजेच संघ सरकार व राज्य सरकार यांच्यात केलेली अधिकारांची विभागणी होय. लोकशाही असलेल्या भारताने विस्तृत भूप्रदेश व वाढती लोकसंख्या विचारात घेऊन संघराज्य शासन पध्दतीचा स्वीकार केला आहे.

भारतीय संघराज्याचे अधिकृत नाव 'भारत' असावे की 'इंडिया' यावर घटना समितीत बराच वाद झाला. काही सदस्यांच्या मते, हा देश जगात 'इंडिया' नावाने ओळखला जातो. तेव्हा हेच नाव भविष्यात कायम ठेवणे देशहिताचे ठरेल. याउलट काही सदस्यांच्या मते, देशाचे मूळ नाव 'भारत' असल्याने तेच स्वीकारण्यात यावे. शेवटी तडजोड अती असे ठरविले की, "India that is Bharat" असा नामोल्लेख संविधानात करण्यात आला आहे.

भारतीय राज्यघटनेच्या पहिल्या कलमात असे स्पष्ट केले की, "भारत हा राज्यांचा संघ असेल", संघराज्याऐवजी 'राज्यसंघ' या शब्दाचा वापर करण्यात आला आहे. "India, that is Bharat shall be a union of states" असा नामोउल्लेख संविधानात करण्यात आला आहे.

**भारतीय संघराज्याची रचना : (Structure of Indian federalism)**

भारतीय संविधानात 'संघराज्य' असा उल्लेख केलेला नाही. उलट 'भारत राज्यांचा संघ' असल्याचा उल्लेख सापडतो. राज्यांच्या हक्कांना बाधा न आणता राष्ट्रीय ऐक्य आणि सामर्थ्य यांची निर्मिती व्हावी म्हणून केलेल्या संयोजनाला संघराज्य असे म्हटले आहे.भारतीय संविधानात संघराज्य (Federation) ऐवजी राज्याचा संघ (Uninon of the States) असा उल्लेख केलेला आहे. हा शब्द जास्त एकतावादी आहे. या संदर्भात बोलताना डॉ.आंबेडकरांनी असे स्पष्ट केले होते की,"भारत संघराज्य वाटत असला तरी हा संघ त्यामध्ये सम्मिलित झालेल्या प्रदेशाच्या समझोत्याचा परिणाम म्हणून निर्माण झालेला संघ नाही. त्यामुळे या संघातून बाहेर पडण्याचा अधिकार कोणत्याही घटक राज्याला नाही." यावरुन असे स्पष्ट होते की,

1. भारत 'एकात्मक राज्य' (Unitary state) नाही.
2. सर्वसाधारण परिस्थितीत भारतीय राजकीय व्यवस्था संघात्मक राज्यासारखी आहे.
3. भारतात केंद्र आणि घटक राज्ये सरकार आहेत.
4. केवळ वर्तमानकाळातील संघराज्यातील सरकारच्या तुलनेत केंद्र सरकारला जास्तीचे अधिकार आणि घटक राज्यांवर नियंत्रण ठेवण्याची शक्ती प्रदान करण्यात आलेली आहे.

**भारतीय संघराज्याची वौशिष्टये :**पुढीलप्रमाणे भारतीय संघराज्याची थोडक्यात वौशिष्टये सांगता येतात.

1. भारताचे लिखित संविधान आहे, घटकराज्य आणि केंद्रशासन यांच्यातील अधिकाराची विभागणी संविधानानुसार केली आहे.
2. भारतीय संघराज्यासाठी स्वतंत्र एकेरी न्यायव्यवस्था आहे.
3. केंद्र व घटकराज्याच्या अधिकाराबाबत स्पष्ट विभागणी करण्यात आली आहे. महत्त्वाचे विषय केंद्राकडे ठेवून घटकराज्यापेक्षा केंद्राला शक्तीशाली बनवले आहे.
4. संपूर्ण भारतासाठी एकच संविधान आहे.

5. कायदेमंडळाच्या व्दितीय सभागृहावर म्हणजे राज्यसभेवर लोकसंख्येच्या प्रमाणात घटक राज्याना प्रतिनिधीत्व आहे.
6. घटकराज्यातील संवैधानिक प्रमुखाची (राज्यपालाची) नियुक्ती राष्ट्रपतीव्दारे ((केंद्राव्दारे) केली जाते.
7. भारतात एकेरी नागरिकत्व आहे. भारतात अमेरिकाप्रमाणे घटकराज्याचे वेगळे नागरिकत्व दिले जात नाही.

**केंद्र-राज्य संबंध :**

भारतात लिखित संविधान आहे. घटक राज्यात व केंद्रात सत्तेची विभागणी केलेली आहे. स्वतंत्र न्यायव्यवस्था आहे. म्हणजे काही संघराज्याची वैशिष्टये भारतात आढळून येतात. अर्थात भारत हे एक 'संघराज्य' आहे. भारतात प्रबळ केंद्र सरकार आहे हे खरे असले तरी जगातील सर्व राष्ट्रातील संघराज्यात कमी जास्त प्रमाणात केंद्र सरकार प्रबळ असतेच. उदा.अमेरिका, कॅनडा, स्वित्झर्लंड इत्यादी.केंद्र राज्य संबंधात अनेक वेळा काहीना काही कारणासाठी वाद होतात. म्हणून केंद्रराज्य संबंधाच्या पुनर्रचनेची मागणी होते. भारतीय संविधानात कलम 245 ते कलम 300 भाग 11 व 12 मध्ये केंद्र राज्य संबंधाचे सविस्तर वर्णन करण्यात आले आहे. त्यानुसार दोन्ही शासनाचे अधिकार विषय निश्चित करुन त्याची यादी संविधानाच्या 7 परिशिष्टात दिली आहे. केंद्र - राज्य संबंधात वाद निर्माण झाल्यास वाद सोडवण्याचा अधिकार भारताच्या सर्वोच्च न्यायालयाला देण्यात आला आहे.
केंद्र राज्य संबंधाचा विचार करताना तीन प्रकारात विभाजन करता येईल.

अ) कायदेविषयक संबंध
ब) प्रशासकीय संबंध
क) आर्थिक संबंध

**अ) कायदेविषयक संबंध :** कायदेविषयक संबंधात पुढील तरतूदींचा समावेश होतो.

**1) संघसूची :** ज्या विषयावर फक्त केंद्रसरकारला कायदे करता येतात. त्या कायद्याची यादी संघसूची मध्ये दिली आहे. या सुचित राष्ट्रीय दृष्टीने महत्त्वाच्या विषयांचा समावेश करण्यात आला आहे. उदा. परराष्ट्र खाते, संरक्षण, लष्कर, अणुशक्ती,विमा, खनिज संपत्ती, चलन, रेल्वे, विमान पोस्ट इत्यादी. सुरुवातीला संघसूचीत 97 विषय होते. घटनादुरुस्ती करुन संघसूचीत आता 99 विषय आहेत.

**2) राज्यसूची :** ज्या विषयावर राज्य सरकार कायदा करते अशा विषयाचे समावेश राज्यसूचीत करण्यात आला आहे. राज्यसूचीत घटकराज्याला उपयुक्त अशा स्वरुपाच्या विषयाचा समावेश राज्यसूचीत करण्यात आला. उदा.राज्यांतर्गत दळणवळण, तुरुंग, सार्वजनिक आरोग्य, शेती, पशुपालन, पोलीस, बाजारपेठा, जुगार, सिनेमागृह इत्यादी राज्यसूचीत सुरुवातीला 66 विषय होते. संविधान दुरुस्तीने राज्यसूचीत 5 विषय कमी करुन आता 61 विषय राज्यसूचीत आहेत.

**3) समवर्ती सूची :** ज्या विषयावर कायदा करण्याचा अधिकार केंद्र व घटकराज्याना दोघांनाही आहे. त्या विषयाची यादी समवर्ती सूचीत देण्यात आली आहे. सुरुवातीला समवर्ती सूचीत 47 विषय होते.
समवर्ती सूचीत बदल करुन 5 विषयांचा समावेश करुन आता 52 विषय आहेत. संवेदनशील व सर्व भारतात एकात्मता निर्माण करण्यासाठीचे आवश्यक विषय समवर्ती सूचीत आहेत. उदा.वृत्तपत्र, व्यापार, रोजगार, न्याय, घटस्फोट, विवाह,फौजदारी कायदा, नागरी कायदा, विवाह व घटस्फोट, लो.संख्या नियंत्रण, कुटूंबनियोजन, वीज कामगार कल्याण, आर्थिक, सामाजिक नियोजन, औषधे वजन व मापे इत्यादी.या विषयावर केंद्र-राज्यांना दोघांनाही कायदा करण्याचा अधिकार असेल तरी केंद्र सरकारने केलेल्या कायद्यावर घटक राज्याला कायदा करता येत नाही. घटकराज्याने केलेल्या कायद्यावर केंद्र सरकारला कायदा करता येतो. ज्या विषयावर केंद्र सरकारने कायदा केला नाही त्या विषयावर घटकराज्य कायदा करु शकतात.

**4) शेषाधिकार :** संविधान निर्मिती करत असताना संविधानकारांनी जाणीवपूर्वक सर्व विषयांचा समावेश केंद्रसूची, राज्यसूची, समवर्ती सूचीत करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र भविष्यकाळात गुंतागुंत व येणाऱ्या अडचणी संबंधीची भविष्यवाणी करणे अशक्य होते. वरील सूची व्यतिरिक्त जे विषय भविष्यात निर्माण होतील त्या संबंधीचे कायदे बनवण्याचा अधिकार केंद्राला देण्यात आला आहे. त्या अधिकारास शेष अधिकार म्हणतात.

**5) राज्यसूचीतील विषयावर कायदे करण्याचा केंद्राचा अधिकार :** राष्ट्राच्या हितासाठी राज्यसूचीतील एखाद्या विषयावर संसदेला कायदा करावयाचा असल्यास संविधान कलम 249 नुसार तशा स्वरुपाचा ठराव राज्यसभेने पास करणे आवश्यक आहे.

संसद अशा स्वरुपाचा कायदा एक वर्षासाठी करु शकते. पुन्हा त्या विषयावर कायदा करावयाचा असेल तर पुन्हा राज्यसभेची मान्यता आवश्यक आहे.

**6) राष्ट्रीय आणीबाणी संबंधाची घोषणा :** परकीय आक्रमण किंवा अंतर्गत अशांतता निर्माण झाल्यास 352 कलमानुसार राष्ट्रपती राष्ट्रीय आणीबाणी घोषित करतात. राष्ट्रीय आणीबाणीनंतर राज्यसूचीतील विषयावर कलम 250 नुसार कायदा करण्याचा अधिकार संसदेला प्राप्त होतो. आणीबाणी संपल्यानंतर सहा महिने संसदेने केलेले कायदे अंमलात असतात.

**7) दोन किंवा अधिक घटकराज्यांनी कायदा करण्यासाठी संसदेला केलेली विनंती :** संविधान कलम 252 नुसार दोन किंवा अधिक घटकराज्याने एखाद्या राज्यसूचीतील विषयावर संसदेने कायदा करावा असा ठराव पास केल्यास संबंधीत घटकराज्यासाठी संसद कायदा करते. संसदेने केलेल्या कायद्यात बदल करण्याचा अधिकार घटकराज्यांना नाही.

**8) घटकराज्यातील आणीबाणी :** घटकराज्यातील शासन संवैधानिक मार्गाने चालण्यास असमर्थ असेल तर राष्ट्रपती 356 कलमानुसार घटकराज्याची आणीबाणी लागू करतात. 357 व्या कलमानुसार घटक राज्याचे कायदेशीर अधिकार संसदेला प्राप्त होतात.आणीबाणीची घोषणा संपल्यानंतर आणीबाणीच्या काळात केलेले कायदे एक वर्षापर्यंत अंमलात राहतात.

**9) राष्ट्रपतीच्या संमतीसाठी घटकराज्याचे विधेयक राखून ठेवणे :** संविधान कलम 200 ते 201 नुसार राज्यविधीमंडळाचे केलेले विधेयक राज्यपाल राष्ट्रपतीच्या संमतीसाठी राखून ठेवू शकतात, राष्ट्रपतीला विशिष्ट कालावधीत विधेयक स्वीकारणे अथवा नाकारण्यासाठी विशिष्ट कालमर्यादा नाही.राष्ट्रपतीने नाकारलेल्या विधेयकावर राज्यविधीमंडळ कायदा करु शकत नाही.

**10) आंतरराष्ट्रीय कायदा पालनासंबंधी :**संविधान कलम 253 नुसार आंतरराष्ट्रीय तह, करार किंवा राजकीय परंपरेच्या पालनासाठी राज्यसूचीतील कोणत्याही विषयावर संसद कायदा करु शकते.

**ब) प्रशासकीय संबंध :**

संघराज्यात केंद्र आणि घटकराज्यांना आपआपल्या जबाबदा-या सहकार्य आणि समन्वयाने पार पाडाव्या लागतात. केंद्र आणि घटकराज्यात परस्पर वाद व संघर्ष निर्माण होऊ नयेत म्हणून प्रशासकीय संबंधाचे सविस्तर विवेचन संविधानात दिले आहे ते पुढीलप्रमाणे.

**1) घटकराज्य सरकारांना मार्गदर्शन करणे :** संसदेने निर्माण केलेल्या कायद्यात अंमलबजावणीसाठी अडचण येऊ नये म्हणून राज्यसरकारांनी आपली कार्यकारी शक्ती कशी वापरावी या संबंधीचे मार्गदर्शन केंद्र करु शकते. (कलम 256)

**2) घटक राज्याचे शासन केंद्रीय शासनाची सहाय्यभूत असावे :** संविधान कलम 257 मध्ये स्पष्ट केले आहे की, घटक राज्याने आपली कार्यकारी सत्ता केंद्रीय कार्यकारी सत्तेला पोषक व सुसंसगत असेल अशी वापरली जावी म्हणजे केंद्र सरकारच्या कायद्याच्या विरोधात घटकराज्याने कोणत्याही स्वरुपाचे कायदे करु नयेत.

**3) केंद्राव्दारे घटक राज्यांना आदेश देण्याचा अधिकार :** संविधान कलम 257 (2), 257 (3) नुसार स्पष्ट केले आहे की, राष्ट्रीय आणि लष्करी दृष्टया महत्वपूर्ण दळणवळणाच्या साधनांची उभारणी किंवा त्याची सुव्यवस्था ठेवण्यासाठी केंद्र राज्यशासनाला आदेश देवू शकते. तसेच राज्याअंतर्गत रेल्वेला संरक्षण देण्याबाबत आदेश देवू शकते हे केंद्राचे आदेश घटकराज्यासाठी बंधनकारक असतात.

**4) केंद्र सरकारची कार्य राज्यशासनाकडे सोपवणे :** संविधान कलम 258 नुसार केंद्र सरकार आपले काही कार्य राज्यसरकारवर सोपवू शकते ते कार्य करणे घटकराज्यासाठी बंधनकारक असेल हे सोपवलेले कार्य करण्यासाठी घटकराज्याला जो खर्च येईल त्या खर्चाची भरपाई केंद्रसरकार देईल. उदा.लोकसभा, राज्यसभेच्या सदस्यांचे निर्वाचन खर्च

**5) अखिल भारतीय नोकर भरती :** संविधानाने केंद्र सरकार व राज्यसरकारसाठी वेगवेगळा नोकर वर्ग निर्माण केला आहे. केंद्र सरकारचे आणि राज्य सरकारचे प्रशासकीय अधिकारी आपआपल्या अधिकार क्षेत्रात कार्य करतात. तरीपण काही सनदी सेवा दोन्ही सरकारांना सारख्याच स्वरुपात आवश्यक असतात.राज्यघटनेच्या कलम 312 नुसार संसदेला राष्ट्रीय हिताच्या दृष्टिकोणातून केंद्र सरकार व राज्य सरकार यांना उपयुक्त ठरणाऱ्या सेवा निर्माण करण्याचा अधिकार दिलेला आहे. उदा.IAS, IPS, UPSC च्या सेवेच्या माध्यमातून केंद्र सरकार घटकराज्यात अधिकारी नेमतात, या अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्याचा अधिकार घटकराज्यांना नसतो.

अखिल भारतीय सेवा निर्माण करण्यासाठी राज्यसभेने उपस्थित सदस्यांच्या 2/3 बहुमताने ठराव पास केलयस एखादी नवीन अखिल भारतीय सेवा निर्माण करता येते.

**6) दोन घटक राज्यातील वादासंबंधीची तरतूद :** दोन घटक राज्यात एखाद्या प्रश्नावरुन वाद किंवा संघर्ष असेल तर त्यासंबंधी राष्ट्रपती एखादी समिती नेमून चौकशी करु शकतात. विशिष्ट एखाद्या घटकराज्याला त्यासंबंधी सल्ला व मार्गदर्शन करु शकतात. (कलम 263) कलम 262 नुसार दोन किंवा अधिक घटकराज्यात पाणी वाटपावरुन वाद निर्माण झाल्यास केंद्र लवादाची नेमणूक करु शकते व लवादा-व्यतिरिक्त इतर कोणत्याही न्यायालयात खटला चालवण्यास संसद मज्जाव करु शकते.

**7) राज्यपालाची नेमणूक :** घटकराज्याचा प्रशासकीय प्रमुख राज्यपालाची नियुक्ती राष्ट्रपतीव्दारे केली जाते. राष्ट्रपतीची मर्जी असेपर्यंत राज्यपाल पदावर राहतात.

**8) घटकराज्याची आणीबाणी :** घटकराज्यातील शासन संविधानानुसार चालवले जात नसेल तर राज्यपालाच्या अहवालानुसार राष्ट्रपती 356 व्या कलमानुसार घटकराज्यात आणीबाणी लागू करु शकतात. घटकराज्यातील कायदेमंडळ बरखास्त करुन सर्व कार्यकारी सत्ता राष्ट्रपतीचा प्रतिनिधी म्हणून राज्यपालाकडे येते.

**क) आर्थिक संबंध :**(Centre-state Financial Relations)

संघराज्यात मध्यवर्ती सरकार आणि घटक राज्यांची सरकारे यांचे प्रशासन सुव्यवस्थीत चालावे यासाठी दोहोंचा आर्थिक व्यवहार स्वतंत्र असावा. त्यांच्या मिळकतीच्या आणि खर्चाच्या बाबी स्वतंत्र असाव्यात. आथिकदृष्ट्या घटक राज्ये स्वावलंबी व स्वयंपूर्ण असावीत अशी संघराज्यांची सैध्दांतिक बाजू असली तरीही प्रत्यक्षात घटक राज्ये आर्थिक बाबतीत मध्यवर्ती सरकारवर अवलंबून असलेली दिसतात.भारतीय संविधानाच्या 12 व्या आणि 13 व्या भागांत कलम 264 ते 307 मध्ये केंद्र-राज्य आर्थिक व्यवहारासंबंधी तरतूदी करण्यात आलेल्या आहेत.

**1) केंद्र सरकारच्या उत्पन्नाच्या बाबी :**भारतीय संसदेला केंद्र सरकारच्या स्वाधीन असलेल्या पुढील बाबीसंबंधी कर लावण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. आयात-निर्यात कर तंबाखूवरील कर,निगम कर, हवाई नाविक, रेल्वे प्रवासी व माल वाहतुकीवरील कर शेतीचे उत्पन्न वगळता इतर उत्पन्नावरील कर, औद्योगिक कंपन्यांच्या भांडवलांवरील कर शेतजमीन वगळता इतर मालमत्तेवरील कर, वृत्तपत्राच्या क्रयविक्रयांवरील आणि जाहिरातीवरील कर आंतरराज्यीय व्यापारावरील कर, डाक, तार टेलिफोन, वायरलेस प्रसार या संचार साधनापासून मिळणारे उत्पन्न, हुंडी, चेक्स प्रॉमिसरी नोटसवरील मुद्रांक शुल्क इत्यादी

**2) घटकराज्याच्या उत्पन्नाचे घटक :** खालीलप्रमाणे घटकराज्याच्या उत्पन्नाचे घटक संविधानाने निश्चित केले आहेत. शेतसारा, शेतीच्या उत्पन्नावरील कर, शेतीच्या वारसासंबंधी कर, जमिनी व घरे खरेदी-विक्रीकर, खाणीवरील कर, भारतीय औषधावरील कर, व्यापार व मनोरंजनावरील कर, सीमा शुल्क इत्यादी संबंधीचे उत्पन्न घटकराज्यांना मिळते.

**3) केंद्र सरकारव्दारे कर निश्चिती पण घटकराज्याकडून वसुली :** संविधान कलम 268 नुसार काही कर केंद्र सरकारला लावता येतात. पण या कराची वसूली घटकराज्य करते. उदा.औषधे व सौंदर्य प्रसादनावरील उत्पादन कर, मुद्रांक शुल्क संबंधी केंद्र सरकार कर निश्चित करते. घटकराज्य या कराची वसूली करुन स्वत:कडेच ठेवते. म्हणजेच हे उत्पन्न खर्च करण्याचा अधिकार घटकराज्यांचा आहे.

**4) केंद्र सरकार कर लावते व वसूल करुन घटक राज्यांना देते :** संविधान कलम 269 प्रमाणे काही कर केंद्र आकारते व वसूल ही करते. मिळालेले उत्पन्न घटक राज्याच्या खात्यावर जमा केले जाते. उदा. शेतजमीन वगळून इतर मालमत्तेवरील कर रेल्वे समुद्रे, हवाई मार्ग येणाऱ्या मालावरील सीमा शुल्क, रेल्वे तिकीटावरील कर वर्तमानपत्रातील खरेदी-विक्री व जाहिरातीवरील कर इत्यादी संबंधीचे उत्पन्न केंद्र सरकार घटकराज्यांना देते.

**5) केंद्राच्या उत्पादनावरील काही हिस्सा घटकराज्यांना :** संविधान कलम 270, 271, 272 मध्ये असे स्पष्ट केले आहे की, ज्या उत्पादनाच्या बाबी केंद्राकडे देण्यात आल्या आहेत. त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा काही भाग घटकराज्यांना देता येतो. ही वाटणी वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार संसद ठरवते.

**6) घटकराज्यांना आर्थिक अनुदान :** संविधान कलम 275 नुसार घटकराज्यांना केंद्राच्या आर्थिक मदतीची आवश्यकता असल्यास संसद आर्थिक अनुदान घटकराज्याला देवू शकते. अनुसूचित जमातीच्या विकासासाठी घटकराज्य केंद्राच्या पूर्वपरवानगीने काही योजना राबवत असेल तर त्या योजनेवर होणारा खर्च केंद्र सरकारच्या संचित निधीतून दिला जातो.

**7) कर्ज उभारणी :** संविधान कलम 292 नुसार केंद्रसरकार देशाअंतर्गत किंवा देशाबाहेरुन आवश्यकत वाटल्यास कर्ज घेऊ शकते. घटकराज्याला देशाबाहेरुन कर्ज घेता येत नाही. (कलम 293) घटकराज्याला केंद्राकडून कर्ज दिले जाते.

**8) आर्थिक आणीबाणी :** देशातील आर्थिक स्थिती धोक्यात आली असेल तर कलम 360 नुसार राष्ट्रपती आर्थिक आणीबाणी घोषित करतात. आणीबाणी घोषित झाल्यानंतर घटकराज्याच्या आर्थिक अधिकारावर केंद्राचे वर्चस्व निर्माण होते. केंद्रासह घटकराज्यात नोकरदारांची वेतन कपात केली जावू शकते. या काळात राज्य विधीमंडळाचे धनविधेयक राष्ट्रपती संमती शिवाय मंजूर होऊ शकत नाही.

**9) नियंत्रक व महालेखापरीक्षक :** संविधान कलम 148 नुसार राष्ट्रपती नियंत्रक व महालेखापरीक्षकांची नेमणूक करतो. नियंत्रक व महालेखापरीक्षक केंद्र व घटकराज्याच्या आर्थिक हिशोबाची तपासणी करतो व केंद्राचा अहवाल राष्ट्रपतीला व घटकराज्याचा अहवाल राज्यपालांना सादर केला जातो. हा अहवाल राष्ट्रपती लोकसभेपुढे व राज्यपाल विधानसभेपुढे सादर करतात.

**10) वित्तआयोग :** संविधान कलम 280 नुसार राष्ट्रपती दर पाच वर्षांनी वित्त आयोगाची स्थापना करु शकतात. वित्त आयोगाचे अध्यक्ष व सदस्याची निवड राष्ट्रपती करतात. सध्या 13 व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष विजय केळकर आहेत. 13 व्या वित्त आयोगाच्या शिफारशी इ.स.2010 ते 2015 साठी असतील. वित्त आयोगाव्दारे केंद्र-राज्य संबंधातील आर्थिक साधनाच्या वितरणाचे मूल्यांकन करुन शिफारशी सुचवल्या जातात. संचित निधीतून राज्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानाबाबत शिफारशी करणे, राष्ट्रपतीला आवश्यक त्या आर्थिक बाबीवर सल्ला देणे इत्यादी कार्य वित्तआयोगाला करावी लागतात.

**समारोप :**

केंद्र राज्य संबंधातील कायदेविषयक प्रशासनविषयक, आर्थिक संबंधात पुनर्रचनेची मागणी घटकराज्याकडून वारंवार केली गेली आहे. अनेक वेळेला विविध कारणांसाठी वाद निर्माण झाले आहेत. सुधारणा आयोगाने, राजमन्नार समितीने सरकारीया आयोगाने केंद्र-राज्य संबंध योग्य नसल्याचे मान्य करुन केंद्राला दोषी मानले आहे. केंद्र-राज्य संबंधात पुनर्रचनेची मागणी सतत होत आहे. मात्र आधुनिक काळात केंद्रसरकारला दुर्बल करुन चालणार नाही. अपेक्षा आहे केंद्राने घटकराज्यांना विश्वासात घेऊन कार्य करावे.

**संदर्भसूची :**


1. भारतीय शासन आणि राजकारण – बी.बी.पाटील
2. तौलणिक राज्यशास्त्र, बदलते स्वरुप आणि नवे प्रवाह – प्रा.सुरेश भालेराव (संपादक) प्रा.प्रविण लोणारकर (सह संपादक)
3. भारतीय शासन आणि राजकारण–प्रा.राजशेखर सोलापुरे, प्रा.डी.एच.मेहत्रे
4. आधुनिक राजकीय विश्लेषण – डॉ.इनामदार ना.र.
5. तौलनिक शासन आणि राजनीती – डॉ.देशमुख अलका, प्रा.संजय गोरे
6. राजकारणाचे समाजशास्त्र – डॉ.रा.धो.काचोळे
7. तुलनात्मक राजकीय विश्लेषण – भा.ल.भोळे
8. चार राजकीय व्यवस्था – धांगेरकर चिं.ग.
9. भारताचे शासन आणि राजकारण – डॉ.शुभांगी राठी

**Excel Publication House, Aurangabad**

Plot No:-1/9/50-P Jaisingpura Near University,
Aurangabad – 431001, Maharashtra, India.
Mobile: 9921555069, 9545162848
E-mail: contact@excelpublication.com www.excelpublication.com